**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.10 No.2** **Nov – Dec 2022**

# महाराष्ट्रातील आंध आदिवासी जमातीतील महिलांचा सामाजिक दर्जा एक अभ्यास

**डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**
सहयोगी प्राध्यापक
जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, नवीन नांदेड
**Corresponding Author - डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**
**DOI-10.5281/zenodo.14870797**

**गोषवारा :**

प्रस्तुत अध्ययन हे आंध आदिवासी जमातीतील महिलांच्या सामाजिक दर्जाशी संबंधित आहे. त्यामुळे आंध आदिवासी जमातीत महिलांचा सामाजिक दर्जा कोणत्या प्रकारचा आहे. हे अभ्यासणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील आंध आदिवासीशिनची एकूण लोकसंख्या ३,७२,८७५ इतकी आहे भारतातील आदिवासी समाज हा स्वतंत्र संस्कृती, परंपरा आणि सामाजिक रचनेसाठी ओळखला जातो. महाराष्ट्रातील आंध आदिवासी जमात ही एक महत्त्वाची जमात असून तिच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनशैलीत महिलांना महत्त्वाचे स्थान आहे. तथापि, पितृसत्ताक व्यवस्थेमुळे आणि काही पारंपरिक प्रथा-परंपरांमुळे या जमातीतील महिलांचा सामाजिक दर्जा काही प्रमाणात दुय्यम राहिला आहे.

**बिज संज्ञा :** आंध आदिवासी जमात, महिलांचा सामाजिक दर्जा**,** आर्थिक दर्जा, शैक्षणिक दर्जा.

**प्रस्तावना :**

आंध ही महाराष्ट्रातील आदिवासी जमातीत समाविष्ट केलेली एक जमात आहे. ही जमात महाराष्ट्रात यवतमाळ, वाशिम , अकोला, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी व अमरावती जिल्ह्यात व आंध्र राज्यातील आदिलाबाद जिल्हात वस्ती करून राहते. हा समाज डोंगराळ व दऱ्याखोऱ्याच्या भागात नदी, नाल्याच्या किनाऱ्यावर राहतो. द्विर्भातील यवतमाळ, अकोला, बुलडाणा या जिल्हांमध्ये आंध जमातीचे लोक आढळतात. तसेच नांदेड आणि परभणी जिल्ह्यातही आंधाची वस्ती आहे ते मूळात आंध्रप्रदेशातील आदिलाबादकडचे असून आंध्रातुन आल्यामुळे आंध हे नांव पडले आहे. तसेच ती एक द्रविडीय वंशाची जमात आहे असे रसेल आणि हिरालाल यांनी मत व्यक्त केले आहे. आंध महिला मध्यम बांध्याच्या तसेच काळया सावळया वर्णाच्या असून लुगडे नेसतात व चोळी घालतात. महिलांमध्ये गोंदण करतात. मात्र महिलांच्या राहणीमानातही आधुनिक काळात बदल होत आहेत.

डॉ. गोविदं गारे यांनी 'पैनगंगा नदीच्या खाऱ्यातील आंध आदिवासी' या आपल्या संशोधनात आंध आदिवासी समाजाचा सखोल अभ्यास केला आहे. डॉ. गोविंद गारे यांच्या अध्ययनानूसार आंध ही जमात पैनगंगा नदीच्या खोऱ्यांत वास्तव्य करीत असल्याचे नमूद केले आहे. आंध जमातीचे लोक परस्परांना रक्तसंबंधाने भाऊबदं मानतात. आंध जमातीची जीवनपद्धती इतर समाजाहून वेगळी आहे. आंध लोक स्वतःला हिंदू म्हणतात. आंध जमातीचे मोठया प्रमाणावर सांस्कृतिकीकरण आणि हिंदूकरण झाल्यामुळे या जमातीने आपली अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्टये-हास होत आहेत. असे असले तरी मात्र त्यांची आदिवासी म्हणून असलेली ओळख अद्यापही आहे.

**उद्देश :**

1. आंध आदिवासी जमातीतील महिलांचा सामाजिक दर्जाचे अध्ययन करणे.
2. आंध आदिवासी जमातीतील महिलांचे सामाजिक जीवनाचे अध्ययन करणे

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये द्वितीय स्रोतांचा वापर करून शोधनिबंध लेखन करण्यात आले आहे ज्यामध्ये पुस्तके, संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, दैनिक लेख, शासकीय अहवाल इ. चा वापर करण्यात आलेला आहे.

**आंध आदिवासी जमातीत महिलांचे सामाजिक जीवन व सामाजिक दर्जा :**

आंध आदिवासीमध्ये वेगवेगळया प्रथांचे संवर्धन कले जाते जसे, स्त्रीच्या गर्भारपणाच्या अवस्थेत तिच्यावर बरीच बंधने असतात. पपई, आंबे, फणस खाऊ देत नाहीत. नाला ओलांडणे, स्मशानाजवळ जाणे, वजन उचलने, उडी मारणे या गोष्टी वर्ज्य कराव्या लागतात. मुलगी वयात आल्यानंतर त्याबाबत सुद्धा आंध लोकांमध्ये वेगवेगळया प्रथा व पंरपरा आंध जमातीत आहेत, मात्र आंध लोकांमध्ये बालविवाहाची प्रथा नाही. तर प्रौढ विवाहाची प्रथा होती. परंतु

मध्यंतरीच्या काळात बालविवाह नव्हे जन्मापूर्वीच विवाह ठरविण्याची पद्धती निर्माण झाली. मुलगी वयात आलेली असेल तर लग्नानंतर लगेच मुलाच्या घरी जाते. विवाह एकाच कुळात होत नाहीत. आईच्या भावाच्या मुलीशी विवाह होऊ शकतो. 'साटबाट' विवाह ही होतात. म्हणजे परस्परांच्या घरात मुली देतात. एक पुरूष दोन बहिणींशी विवाह करू शकतो किंवा दोन भावांचे दोन बहिणींशी विवाह होऊ शकतात. पूर्वी या समाजात वधुमूल्याची पद्धती होती. मुलाचे वडील मुलीच्या वडिलांना धान्याच्या रूपात 'हुंडा' देतात.

आंध जमातीत एकपत्नी विवाह रूढ आहेत, मात्र बहुपत्नी विवाहावर जातीबंधन नाही. केवळ श्रीमंत आंध व्यक्तीच दोन बायका करीत असत. घटस्फाटे घेता येतो. विधवा-विवाह ही होतात. मात्र पतीच्या भावाशी किंवा त्याच्या कुळातल्या व्यक्तिशीं विधवेचा विवाह होत नाही. आंध हे हिंदू असून हिंदू देद्वेवतांची पूजा करतात. आंघ समाजात आंधाची वस्ती असणाऱ्या गावात आतीपंचायत असते. मुखिया कारभार पाहतो त्याला मेहत्रा म्हणतात. पंचायती समोर विवाह, घटस्फोट, जमिनिचे वाद लहान-सहान बोऱ्या यासारखे वाद येत असतात. पंन गर्चा करून निर्णय घेतात. आंध लोकांचा परंपरागत व्यवसाय शेती आहे शिकार, पशुपालन हे दुय्यम व्यवसाय करतात आणि या सर्व व्यवसायात आंध महिला आपल्या पतींना आर्थिक सहकार्य करीत असतात. अलीकडे तर आंध महिलांनी स्वत ने लघु व कुटीर उद्योग सुद्धा सुरू केलेले आहेत. वर्तमानकाळात आंध जमातीत मोठे बदल होत आहेत विकासाच्या दृष्टिने पाहता माध्यमिक तसेच पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या आंध मुला-मुलींची संख्या अधिक प्रमाणात आहे या समाजात आज विजेचा वापर होत आहे. शेतीसाठी ते रासायनिक खते व सुधारित बियाण्यांचा वापर करतात. तसेच इलेक्ट्रीक माटे रपंपही वापरू लागले आहेत. ते सरात स्वयंपाकासाठी लाकडांचा आणि गोवऱ्यांचा वापर करीत असत परंतु अनेक शासकीय योजनांमुळे आंध आदिवासींची जीवन पद्धती थोड्या फार प्रमाणात बदललेली दिसून येते. या सोबतच आंध महिलांचा पारंपारिक सामाजिक दर्जा सुद्धा बदललेला दिसून येतो

आंध जमातीला मराठी लोकांचा सहवास लाभला असल्याने त्यांची भाषा बदलत जाऊन त्यांच्या पुढील पिढीची मराठी ही मातृभाषा होत आहे. महाराष्ट्रातील बहुतांश आंध लोक मराठी व कोरकु भाषा बोलतात. यवतमाळ जिल्ह्यातील आंध लोक प्रामुख्याने मराठी भाषा बोलतात. यवतमाळ जिल्यातील आंध लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे तसेच पशुपालन, शिकार आणि सरपण गोळा करणे हे त्यांचे दुय्यम व्यवसाय आहेत. तसेच काही लोक शेतमजूर व मजूर म्हणूनही काम करतात. गेली काही वर्षे आध लोक दुसऱ्यांची शेती कसणे त्याचबरोबर शेती विभागून ती कसणे अशाप्रकारची कामे करतात. शेतीच्या सर्व कामात आंध महिला आपल्या पतींना आर्थिक सहकार्य करतात. आधुनिक काळात बरेच आंध पुरूष आणि महिला सुद्धा सरकारी खात्यात कारकून, लेखनिक, शिक्षक आणि अधिकारी म्हणूनही काम करीत आहेत आधुनिक काळात शिक्षणाच्या प्रभावाने आंध लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक परिवर्तन घडून २२० आंध आदिवासी महिलाः दर्जा व परिवर्तन येत आहे. समाजकारण, अर्थकारण व राजकारण तसेच कुटुंबकल्याण, आधुनिक वैद्यकीय सेवा याबाबत आंध लोक जागरूक झालेले आहेत. शासनाच्या विविध योजना, शिक्षण, रोजगार, सिंचन इत्यादी सुविधेमूळे आंध लोकांचे जीवनमानात सुधारणा हाते आहे. तसेच या जमातीतील महिलांचा सामाजिक दर्जा उंचावत आहे.

**पारंपरिक सामाजिक भूमिका :**

आंध आदिवासी जमातीतील महिला पारंपरिकरीत्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. कुटुंबसंस्था आणि समाजाच्या पारंपरिक व्यवस्थेत त्यांना घरगुती तसेच आर्थिक कार्यांमध्ये सक्रीय सहभाग असतो.

**आर्थिक बाबींमधला सहभाग :**

महिला शेती, लघुउद्योग, जंगलातील उत्पादने गोळा करणे आणि पशुपालन यासारख्या कार्यांमध्ये सहभागी असतात. त्या कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात, परंतु त्यांच्या श्रमांचे योग्य मूल्यमापन सहसा केले जात नाही.

**निर्णयामधील सहभाग :**

आंध जमातीत महिलांना घरगुती निर्णयांमध्ये महत्त्व दिले जात असले तरी, सार्वजनिक आणि राजकीय निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित आहे. पितृसत्ताक व्यवस्थेमुळे अनेकवेळा महिलांचे मत दुय्यम ठरवले जाते.

**शैक्षणिक स्थिति :** गेल्या काही दशकांत शिक्षणाचा प्रसार वाढला असला तरी, आंध आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाचा स्तर तुलनेने कमी आहे. सामाजिक आणि आर्थिक अडचणींमुळे शिक्षण आणि कौशल्यविकासाच्या संधी मर्यादित राहतात.

**आरोग्य आणि सामाजिक कल्याण :**

महिला आरोग्यासंबंधी अनेक समस्या आहेत, जसे की कुपोषण, मातृत्व आरोग्यविषयक सेवा अपुऱ्या असणे आणि आरोग्य सुविधा सहज उपलब्ध नसणे. महिलांना अद्यापही आरोग्य व कल्याणाच्या योजनांचा पूर्ण लाभ मिळत नाही.

**निष्कर्ष :**

आंध आदिवासी समाजात महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षण, स्वयंरोजगार, सामाजिक प्रबोधन आणि सरकारी योजनांचा प्रभावी अंमल यासारख्या उपाययोजना गरजेच्या आहेत. महिलांचे हक्क आणि समानता सुनिश्चित करण्यासाठी स्थानिक स्तरावर नेतृत्व विकसित होणे आवश्यक आहे आंध आदिवासी समाजातील महिलांचे सामाजिक स्थान महत्त्वाचे असूनही त्यांना अनेक सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांच्या हक्कांचे रक्षण व सक्षमीकरण करण्यासाठी धोरणात्मक प्रयत्न आवश्यक आहेत.

आंध जमातीतील महिलांचे कुटुंबाच्या आर्थिक सहकार्यात महत्त्वपूर्ण योगदान असल्यामुळे आर्थिक सहकार्याच्या आधारावर आंध महिलांचा सामाजिक दर्जा आंध पुरूषांच्या बरोबरीचा आढळतो. तर धार्मिक व सामाजिकदृष्ट्या आंध महिलांवर काही बंधने किंवा मर्यादा आढळून येतात. त्यामूळे प्रत्यक्ष वागणूक व व्यवहार या आधारावर आंध महिलांचा सामाजिक दर्जा पुरूषांपेक्षा तुलनेने कमी महत्वाचा असल्याचा दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

१. आगलावे, प्रदिप (२०१०), 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, नागपूर, साईनाथ प्रकाशन, पृ. १७६
२. गारे गोविंद, (२००१), पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदिवासी', पूणे, विद्या प्रकाशन, प. ४३.
३. देवगांवकर एस (२००९), 'महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती', नागपूर, श्रीसाईनाथ प्रकाशन.
४. Johnson, Harry M., (1973), 'Sociology A Systematic Introduction', Bombay, Allied Publishers Pvt. Ltd. (Fourth Indian Reprint)
५. डॉ. गोविंद गारे, 'वैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदिवासी', श्री विद्या प्रकाशन, पुणे, २००१.
६. गारे गोविंद, (२००२), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
७. धनजकर, राजेश, (२०१३), 'मराठवाडयातील आंध जमातीचे लोक साहित्य, नांदेड, अनुराधा प्रकाशन.